# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.२३३३५३६-४०, २३४८००१-०५

E-mail contact@aurangabadmahapalika.org,
est1@aurangabadmahapalika.org


जा.क्र.मनपा/साप्र(आस्था-१)/२०२५/१२११ दिनांक - २८ /०७/२०२५.

**<u>सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.</u>**

**- : <u>जाहिरात</u> : -**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दिनांक १० जून २०२५ नुसार खालील विवक्षित कामांसाठी शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधितांना ज्या कामासाठी अर्ज करावयाचा त्या कामाचा उल्लेख करुन आवश्यक कागदपत्रांसह दि.३०/०७/२०२५ पर्यंत लेखी अर्ज "सामान्य प्रशासन विभाग,मुख्य प्रशासकीय इमारत,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका" येथे दाखल करावेत. सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात राहील.

| अक्र | विवक्षित कामाचे स्वरुप | अर्हता | संख्या |
|---|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीत विविध विभागांतील तांत्रिक प्रकल्पांवर 'मुख्य प्रकल्प समन्वयक' म्हणून काम करणे. | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवीसह पदव्युत्तर पदवी.<br>२) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर काम केल्याचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>३) रस्ते, ड्रेनेज, पाणी पुरवठा, नगररचना या क्षेत्रात काम केल्याचा अनुभव आवश्यक. | ०१ |

**<u>सर्वसाधारण अटी</u>** :-

१. उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठी वरील नमूद केलेली अर्हता व संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात येत आहे. (अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र अथवा सदर पदावरील आदेश व कार्यकाळ)
२. विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतू नियुक्तीस वाढीव कालावधीकरिता मुदतवाढ द्यावयाचे झाल्यास एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.
३. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरणे नसावे याबाबत त्यांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे,त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घेऊन सादर करणे बंधनकारक राहील.
४. क्षेत्रीय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास हे कार्यालय बांधिल राहणार नाही.
५. सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.
६. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

..२..

७. असा सेवानिवृत्त अधिकारी वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल.

८. असा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

९. आपत्कालीन काळात रात्री-अपरात्री गरजेनुसार हजर राहून सर्व कामे करावी लागतील.

१०. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल. तसेच सदर नेमणूका करार पध्दतीने असून सदरील नेमणुकीमुळे कायम सेवेचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. तथा या आशयाची मागणी राहणार नाही,असे हमीपत्र अधिकाऱ्याने सादर करणे बंधनकारक राहील.

११. अशा अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबत संबंधित कार्यालयीन विभागाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१२. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१३. असा अधिकारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१४. अशा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१५. अशा अधिकाऱ्यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ते व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१६. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.

१८. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच महानगरपालिकेच्या गरजेनुसार आवश्यक कामे त्यांच्याकडे सोपवल्यास सदर कामे करणे बंधनकारक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

**<u>मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेनुसार.</u>**

अतिरिक्त आयुक्त-१
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.
दिनांक :- २L /०७/२०२५.

<u>अर्जाचा नमुना</u>

<u>सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा विविध कामांकरिता करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतचा अर्ज.</u>

प्रति,

मा.आयुक्त तथा प्रशासक,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००१.

अर्ज करावयाच्या विवक्षित कामाचे स्वरुप :- ----------------------------------------

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की,मी सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.१०/०६/२०२५ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असून वरील विषयात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने उक्त पदावर काम करण्यास इच्छूक असून माझी माहिती खाली नमूद केल्यानुसार सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण नांव | |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता/संपर्क दुरध्वनी / मोबाईल क्रमांक/Email ID (अनिवार्य) | |
| ३) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व विभाग | |
| ४) | शासकीय सेवेत आल्याचा दिनांक /शासकीय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्तीपर्यंत धारण केलेली पदे व कार्यालय | |
| ५) | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ६) | जन्म दिनांक | |
| ७) | अर्जाच्या दिनांकास पूर्ण वय | |
| ८) | सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र) | |
| ९) | अर्जदार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र | |
| १०) | सद्यस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्तीवेतन (संबंधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |

स्थळ :-

दिनांक :-

स्वाक्षरी